# लेखणीची कहाणी

ह्या टाळेबंदीमुळे मेंदूतील विस्मृतीची कुलुपं उघडली गेलीं आणि त्यातून बाहेर पडली एक छोटीसी दगडी पेन्सिल. आजकाल कोणालाही काळी दगडी पेन्सिल म्हणजे काय ते कळणार नाही. तेव्हां ती एक पैशाला मिळे आणि पांढरी दगडी पेन्सिल २ पैशांना.... म्हणजे महागच!

मला वाटतं ते १९४९ चं वर्ष असावं. माझं शाळेंत नांव घातलं गेलं. शाळेचं दप्तर म्हणजे गळ्यांत अडकवायची किंवा हातांत धरायची एक पिशवी. त्यांत फक्त पाटी आणि पेन्सिल असायची. एखाद दुसरं पुस्तक सोबतीला. लहान मुलांना पेलवेल एवढंच वजन असायचं. काही मुलांकडे खाऊचा डबा असे. आमच्याकडे आईची तब्येत बरी नसल्यानें आम्हांला शाळेसमोरच्या केळीवाल्याकडून एक केळं विकत घेण्यापुरतें पैसे मिळत आणि तेवढ्याने पोट भरे. पण कधी काळ्या दगडी पेन्सिल ऐवजी पांढरी दगडी पेन्सिल मिळाली कीं पराकोटीचा आनंद होई हें मला आठवतं. मला वाटतं चौथीपर्यंत आम्हाला वही कशी असते तें ठाऊक नव्हतं. चौथीमध्ये गेल्यावर मला डबल पाटी, मध्ये दुमडण्याची सोय असलेली, मिळाली होती. पण पेन्सिल तशीच! काही मुलांमुलींकडे पांढऱ्या दगडी पेन्सिली असायच्या पण त्या त्यांच्याकडे कां आपल्याकडे कां नाहीत असे प्रश्न त्याकाळी पडले नाहीत. चौथीची स्कॉलरशिपची परीक्षा कशाने लिहिली तें आठवत नाही.

पुढे वह्या आल्यावर शिसपेन्सिली मिळायला लागल्या. पेन्सिलीखाली बसवलेला खोडरब्बर असला कीं बरं वाटायचं. पण तसला रब्बर चांगला नसतो असं कोणीतरी मनांत भरवलं आणि रब्बरवाल्या लेखणीची अपूर्वाई कमी झाली. हल्लीची मुलं पेन्सिल शार्पनर शिवाय पेन्सिलला टोक काढू शकत नाहीत. पण आमच्याकडे छोटा चाकू किंवा सुरीच्या साहाय्याने तें तासकाम (तासण्याचं काम) करावं लागे. सुरवातीला तें आईचं काम असे. चाकू हाताळण्याचं वय झालं कीं स्वयंसिद्ध व्हावं लागे. शार्पनर्स नंतर आली. परीक्षांच्या वेळी दोन टोकदार पेन्सिली घेऊन जाण्याची प्रथा होती. परत येईपर्यंत दोन्ही पेन्सिलींची टोकं तुटलेली असायची. मार्क्स कमी पडले कि पेन्सिलींची टोकं तुटलेली होती असं जाहीर करायला त्यांचा आधार असे.

मध्ये कधीतरी मोडी लिपीची तोंड ओळख करून दिली गेली होती. मोडी  लिहिण्याने अक्षर वळणदार होतं असा एक समज होता. हायस्कूलला असतांना अक्षर चांगलं होण्यासाठी टाक आणि शाईची दौत वापरण्याचा एखादा तास असे असं अंधुक आठवतं. टाकाला पूर्वी काळीं बोरू म्हणत असं ऐकिवांत होतं. चांगलासा टाक निवडून त्याला निब बसवणं ही एक महत्वाची पण सोपी क्रिया असे. मग तो टाक शाईच्या दौतीत अलगद बुडवून आपली बोटं शाईपासून अलिप्त राहतील अशा रीतीने तो वापरावा

लागे. कागदावर शाईचा डाग पडू न देणं हें मार्क्स मिळवण्याइतकंच कठीण असे. ही टाक आणि शाईची सवय पुढे डिपार्टमेंट मध्ये काम करतांना कामी आली. माझ्या पहिल्या हाऊस पोस्टच्या वेळी डिपार्टमेंट मध्ये शाईची दौत आणि टाक असे.. मॅडमनी सांगितल्याप्रमाणे आधीच्या सर्व तपासण्यांची रजिस्टर्स मी टाक आणि दौतीच्या साहाय्याने बनवलेली मला आठवतात. सर्रास बॉलपेन्सचा वापर नंतरचा !

फाउंटन पेन चा वापर शाळेपासूनच झाला. पेन मध्ये शाई भरणं हें महत्वाचं काम असे. बहुधा शाईची एक मोठी बाटली घरी आणली जाई. त्यातून लहान दौतीत शाई बाहेर न सांडता ओतून ठेवणं हें काम पण आईचं. लहान दौतीतून ड्रॉपरच्या सहाय्याने शाई काढून ती आपपल्या पेनांत भरण्याचं काम प्रत्येकानं स्वतः करायचं.

नवीन पेन मिळालं कीं आंनद व्हायचा. पण काही दिवसांनीं हाताची बोटं शाईमय व्हायला लागली कीं आपलंच पेन वाईट कां असा न्यूनगंड निर्माण व्हायला लागे. माझ्या वडिलांनीं आईला एक पार्कर पेन आणलं होतं आणि पार्कर पेन हें त्या काळचं सर्वात मशहूर पेन.आणि आई तें फार जपून ठेवायची. माझा त्याच्यावर डोळा असायचा आणि कुठच्याही परीक्षेला जातांना मी तें लकी म्हणून न्यायची.

ह्या डाग पाडण्याऱ्या शाईचा ब्लॉटिंग पेपर नांवाचा एक सखा असे. भलत्या ठिकाणी पडलेल्या शाईला 'लॉक डाऊन' करायला तो उपयोगी होई. कधीकधी त्या बिचाऱ्या ब्लॉटिंग पेपरला पूर्णपणे शाईमय झाल्यानंतरही वापरांत असलेला पाहिला आहे. काटकसरीने राहण्याचे ते दिवस होते. कालांतराने ह्या ब्लॉटिंग पेपरचा उपयोग आईसक्रीम मध्ये शिताफीने केला, त्या काळच्या चवदार प्रसिद्ध आईस्क्रीम कर्त्याने, असं ऐकिवात आलं होतं. खरं-खोटं तो बातमीदार आणि आईस्क्रीमवाला जाणे! आताच्या पिढीला ह्या परीकथाच वाटतील कदाचित!

शाईच्या पेनाचा पुढचा अवतार म्हणजे बॉलपेन. ह्या बॉलपेनचा इतिहास चाळतांना असं लक्षांत आलं कीं अशा प्रकारच्या उपयुक्त लेखणीचा शोध १८८८ पासूनचा आहे. लॉड नांवाच्या वकिली शिकलेल्या पण चामड्याच्या उद्योगांत रस असलेल्या व्यक्तीने चामड्यावर रेखाटण्यासाठी प्रथमतः अशा प्रकारच्या लेखणीची निर्मिती केली. इथे लिहिण्याची क्रिया एका चिमुकल्या धातूच्या वाटोळ्या चेंडूने होई. तो छोटासा गोल पेनच्या टोकाशी एका छोट्या खोबणींत बसवलेला होता. हा प्रयत्न जरी चामड्यावर यशस्वी झाला तरी त्याच्यात अनेक त्रुटी होत्या. अनेक प्रकारच्या कमतरतांचा अभ्यास करून, त्यांत सुधारणा केल्या गेल्या. आणि लासझलो बिरो ह्या हंगेरियन वृत्तपत्र संपादकाने आपल्या रसायनशास्त्रज्ञ भावाच्या मदतीने सध्याच्या प्रचलित बॉलपेनचा पाया घातला. बिरोच्या सुधारणेमध्ये शाईची घनता आणि बॉल -सॉकेटचा वापर असल्यानें शाई न सुकतां प्रमाणित स्वरूपांत

बाहेर पडणें ह्या गोष्टी अंतर्भूत होत्या.

बॉलपेनच्या स्वरूपांत अनेक बदल होत गेले. भारतांत बॉलपेनचा शिरकाव स्वातंत्र्योत्तर झाला असावा.

सुरवातीला त्याला बॉल पॉईंट पेन असंच म्हणत असत. नंतर ते बॉलपेन झालं आणि त्याच्यामुळे हस्ताक्षर कसं खराब होतं यावर चर्चा होत. परीक्षेत बॉलपेन वापरायला बंदी असे. पण मला अजून आठवतंय कीं मेडिकलच्या दुसऱ्या वर्षी वॉर्ड राऊंड च्या वेळी सुप्रसिद्ध सर्जन डॉ. पी. के. सेन यांनी बॉलपेन वर एक लेक्चर घेतलं होतं. त्यांची क्लिनिक्स अशीच सर्जरी सोडून अनेक विषयांवर असत. त्यावेळी ते काय आणि कां शिकवत आहेत तें कळत नसे. पण कालान्तराने त्याचा मतितार्थ ध्यानात येई. "Be Progressive" हें समजावण्याची त्यांची ती पद्धत होती. सर्जरी पुस्तकांतून आणि ऑपरेशन थिएटर मध्ये शिकायची ! History Taking साठी भाषांची कशी आवश्यकता असते हें ते समजवत. नंतर पदव्युत्तर शिक्षणांत माझा त्यांच्याशी जवळून संबंध आला आणि त्यांच्या दूरदृष्टीचा आणि विचारांच्या प्रगल्भतेचा प्रत्यय आला. तरीपण त्यांच्या बॉलपेनवरच्या क्लिनिकची अधूनमधून आठवण होई. एकदा तर मी लायब्ररीत बसले असतानां ते तिथे आले आणि त्यांना लिहिण्यासाठी पेन पाहिजे होतं. माझ्याकडे पेन नव्हतं पण रिफील होतं ज्याने मी माझ्या नोट्स काढत होते. मला माझ्या गबाळेपणामुळे संकोच वाटला पण त्यांनी निर्विकारपणे तें रिफील वापरून परत केलं.

कालांतराने बॉलपेन बनवणाऱ्या अनेक कंपन्या अस्तित्वांत आल्या आणि त्यांची विविध प्रकारची पेनंपण बाजारांत मिळू लागली. दोन किंवा चार रंगाची रिफिल्स एकत्र असणारी बॉलपेन्स आली. वरिष्ठ दर्जा दर्शवणारी रुबाबदार बॉलपेन्स आणि सर्वसामान्यांसाठी साधी, बाजारांत मिळायला लागली. गेल्या वर्षी मला फॅब्रिक कलरची पण पेन्स मिळाली आणि जग कसं पुढे जातंय असं वाटायला लागलं.

पण आता तर कहरच झालाय. ह्या स्मार्ट फोनच्या काळांत आवाजाचं रूपांतर लिखाणांत व्हायला लागलंय मग इतका काळ जपलेल्या लेखणीचं काय होणार ?

**डॉ. मालिनी नाडकर्णी**